# नागरिक अधिकार

वर्ष १ ले. अंक २ रा. रायगड दिनांक १ ते ३१ ऑगष्ट २०११ पाने १६ किंमत २० रूपये

## महाराष्ट्रातील महाभ्रष्ट परिवहन खात्याचा पंचनामा !

# RTI चा मारा दणका, RTO चा तोडा भ्रष्ट मनका !






## पैसे मागणाऱ्या भ्रष्ट शासकीय नागोबांना लाचप्रतिबंधक विभागाच्या पिंजऱ्यात बंद करा !

## माहिती अधिकाराची जादू वंडरफूल मागीतली माहिती, मिळाले घरकूल !

## रेडिमेड प्रश्नावली

**माहिती अधिकारात सर्व सरकारी विभागांना कशी ,काय व कोणती माहिती मागावी ?**



## पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार

# दिल्ली की बिल्ली और शेर अण्णा !

*माहितीचा अधिकार कायद्याचा प्रसार व प्रचार करणारे झुंजार मासिक !*

मासिक
# नागरिक अधिकार

*संपादक*
**सुभाष बसवेकर**
*कार्यकारी संपादक*
**गणेश काजळे पाटील**
*संपादक मंडळ*
*जिल्हा प्रतिनिधी*
राजेश बने (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई )
आप्पासाहेब मगर (ठाणे)
रमेश खेतावत (पुणे )
प्रीतम यादव ( सातारा)
बालाजी आडसूळ (लातूर)
अविनाश मुठे (नागपूर)
देवीदास चौथमल (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या १ तारखेला प्रसिद्ध होतो.
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.
सर्व वादविवाद (पनवेल,न्यायालय कार्यकक्षेत)
रेखाचित्रे,चित्रे इंटरनेटच्या सौजन्याने

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-९६, सेक्टर -१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
महाराष्ट्र, मो ९२२३५१६९२०

E- mail :
mediamansubhash@gmail.com

## संपादकीय

### वाचा आणि थंड बसा !

मी गुलाम आहे.माझ्या देशात माझ्या सारखेच करोडो गुलाम आहेत.आम्ही गुलाम लोक शेतावर गाढवाप्रमाणे राबतो,कारखान्यात घोड्याप्रमाणे धावतो.लोकलच्या गर्दीत मेंढराप्रमाणे प्रवास करतो,बॉम्बस्फोटात कूत्र्याच्या मौतीने मरतो.आम्ही घाम गाळून संपत्ती निर्माण करतो.सरकारचा टॅक्स रांगा लावून भरतो.आम्ही गुलाम असलो तरी शहाणे गुलाम आहोत,आमचे शहाणपण इतकं महान आहे की आम्ही शहाणपण वापरून नेमके भ्रष्ट,गुंड व धनदांडगे लोक प्रतिनिधी निवडून देतो.या आमच्या देशात निवडून गेलेले लोकप्रतिनिधी,नोकरशहा,त्यांचे ठेकेदार आणि गुंड मवाली अशी मुठभर मंडळीच सन्माननीय माणसे आहेत.खरं तर ही साधी माणसे नाहीत.हे महामानव आहेत.आम्हा १२० करोड गुलांमावर राज्य करण्यासाठीच ही मुठभर सन्मानीय माणसे जन्माला आली आहेत. ती आमच्यावर राज्य करताहेत हे आमचे भाग्य आहे.आमच्यावर त्यांनी निरंतर राज्य करावं,त्यांनी घोटाळे करावेत,फ्रॉड करावेत,कारण ती आमच्या प्रमाणं गुलाम थोडीच आहेत.ती माणसं आहेत,त्यांना तो अधिकार आहे,श्रीमान अशोकराव ॲण्ड कंपनींनी केवळ एक आदर्श बिल्डींगमधील दहा-वीस सदनिका हाणल्या,खरं तर अख्खी मुंबई जरी त्यांनी गूपचूप विकली असती तरी त्यांचे कोण काय वाकडे करू शकत होता.परंतु आम्हा गुलामांविषयी त्यांच्या मनात अत्यांतिक कळवळा आहे म्हणूनच त्यांनी मुंबई विकण्याची कल्पना सुद्धा मनात आणली नाही.हे आमच्यावर अशोकरावांचे उपकार नाहीत काय ? राजानी घोटाळा केला, केवळ टूजीचा घोटाळा केला.मनात आले तर दूरसंचार मंत्रालय, एमटीएनएल, बीएसएनएलच्या देशभरातील सर्व कार्यालयाच्या जागा,टेलीफोन खात्याच्या मशीनरी अशी सारी मालमत्ता विकून आता केला यापेक्षा दसपट मोठा घोटाळा राजा सहज करू शकले असते.परंतु राजा यानी तसे केले नाही. हे राजाचे गुलाम प्रजेवर उपकारच नाहीत का ? कलमाडीनी खेळखंडोबा केला,पण त्यांनी खेळ तर पार पाडले.मनात आले तर ते विजयी खेळाडूंच्या गळ्यात नकली सोन्याची पदके घालू शकले असते.इतक्या खालच्या पातळीवर ते उतरले नाहीत.यावरूनच कलमाडी यांना नैतिकतेची चाड आहे हे सिद्ध होते. घोटाळे झाले नसते तर मिडीया ला विषय मिळाले असते का ? थ्रिलींग विषयाअभावी जर पेपर व टिव्ही वाहिन्या बंद पडल्या असत्या तर हजारोंच्या पोटावर पाय पडले असते.शिवाय ही नव नवी भ्रष्टाचारांची प्रकरणे पाहून आमच्या नव्या पिढीला झटपट श्रीमंत होण्याचे, परिश्रमाशिवाय जगण्याचे भन्नाट शार्टकट मिळाले असते का? अशा सर्व महामानवांनी यापूढे ही असेच नव नवीन घोटाळे करून आम्हाला कायमस्वरूपी सन्मानाने गुलामीत जगण्यासाठी प्रेरणा देत राहावे एवढी एकच याचना !

**इतरांना आनंद देत देत आपण खरा आनंद मिळवणे म्हणजे खरे जगणे होय.**

# RTI चा मारा दणका RTO चा तोडा भ्रष्ट मनका

## महाराष्ट्रातील महाभ्रष्ट परिवहन खात्याचा पंचनामा !




महाराष्ट शासनाचे प्रत्येक जिल्हा व मोठ्या शहरात परिवहन अर्थात आरटीओ कार्यालय आहे.या कार्यालयात त्या त्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांनी खरेदी केलेल्या सर्व प्रकारच्या वाहनांची नोंदणी,वाहनांचा करभरणा तसेच व्यावसायिक वाहनांची वार्षिक तपासणी होते.तसेच वाहन चालवण्याचे सर्व चालक परवाने अर्थात ड्रायव्हिंग लायसन दिले जातात.या आरटीओच्या कार्यालयात आरटीओ, मोटार निरिक्षक,क्लार्क ते अगदी शिपायापर्यंत सर्व कर्मचारी पैसे घेतल्याशिवाय कामे करीत नाहीत.महाराष्ट्रात सर्वसामान्य जनतेकडून पैसे खाण्यात पोलीस खात्याचा पहिलानंबर लागतो.पोलीस खात्यानंतर सामान्य जनतेकडून सर्वांधिक पैसे खाणारे खाते म्हणून आरटीओचा नंबर लागतो.आजच्या धावपळीच्या युगात स्वत:चे वाहन असणे ही सर्वसामान्य माणसाची गरज बनली आहे.पूर्ण राज्यातील प्रत्येक कार्यालयात आरटीओ अधिकारी व जनता यांच्यात कोणत्याही कामासाठी प्रत्यक्ष संबंध व संवाद गेल्या पन्नास वर्षात कधीच प्रस्तापित होऊ दिला जात नाही.या कार्यालयात आरटीओ एजंट नावाची एक खासगी यंत्रणा कार्यरत असते.या एजंटाच्या मार्फत बहूतांश कामे होतात.एजंट मध्ये असणे हे आरटीओसाठी पैसे खाण्यासाठी सोयीचे ठरते.म्हणून अनेकदा आक्षेप घेऊन ही एजंट नावाची संस्था कायम राहिली.हे एजंट गरजु ग्राहकांकडून शासकीय ठरलेल्या शुल्कापेक्षा भरमसाठ पैसे घेऊन कामे करून देतात. मंध्यतरी या एजंटाना वाहनधारकांचे प्रतिनिधी म्हणून वैधानिक मान्यता देण्याचे बोलले जात होते परंतु हा प्रस्ताव शासनाने बासणात का गुंडाळून ठेवला हे कळत नाही.तसे झाले असते एजंटांची अधिकृत फिस ठरली असती आणि आरटीओ व मोटार निरिक्षकांना लाच खाण्यास वाव राहिला नसता.

एजंटाच्या शोषणाशिवाय या आरटीओ कार्यालयात प्रत्यक्षात चालवण्यास योग्य व फिट नसणाऱ्या वाहनास फिटनेस प्रमाणपत्र देणे,वाहनावरील व्यवसाय व अन्य कर कमी-जास्त करणे अशा अनेक कामात अधिकारी पैशे खातात. प्रवासी वाहनांचा कर,लक्झरी टॅक्स आदी बाबत अनेकदा पैसे खाऊन अनियमितता कायदेशीर करून दिली जाते.

**अलीकडे मुंबई व पेण आरटीओ खात्यात परदेशी बनावटीच्या दूचाकीची बोगस नोंदणी केल्याचे प्रकार उघडकीस आले होते.हा घोटाळा करोडो रूपयाचा असून हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.यात अनेक आरटीओ अधिकारी निलंबीत झाले आहेत.माहिती अधिकार वापरून शोध घेतल्यास आरटीओ अधिकाऱ्यांचे अनेक काळे कारनामे समोर आल्यशिवाय राहणार नाहीत.**

माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी आरटीओ खात्याची माहिती विचारताना त्या त्या ठिकाणच्या आरटीओ कार्यक्षेत्रात नोंदवलेल्या एकूण प्रवासी व व्यवसायीक वाहनांची नोंद माहित करून घ्यावी तसेच दरवर्षी या सर्व वाहनांची वार्षिक फिटनेस तपासणी वेळेवर होते काय याची माहिती घ्यावी.या भागात एजंट किंवा कर्मचारी प्रत्यक्षात पैसे मागत असल्यास सरळ लाचलूचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार करून पैसे मागणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी.बोगस व खोटी कागदपत्रे देऊन्ा वाहनचालक परवाने देण्याचा प्रकार आरटीओ कार्यालयात सर्रास चालतो.माहिती अधिकारात शोध घेऊन अशी बोगस प्रकरणे बाहेर काढता येतील.मुंबईत काही कार्यकर्त्यांनी या संदर्भात आरटीओ विरोधात न्यायालयात जनहित याचिका दाखल केलेली आहे.

आधी कधीच न मिळवलेलं मिळवण्यासाठी आधी कधीच न केलेलं करावं लागेल.

# माहिती अधिकार कार्यकर्त्यांनो या नमूना अर्जाचा आधार घ्या आणि आपल्या भागातील आरटीओ विभागाची माहिती विचारा

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

(झोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

प्रादेशिक /उपप्रादेशिक परिवहन आधिकारी,-----------

१) अर्जदाराचे नांव - ---------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :--------------------------------------------------------

३) माहितीचा विषय - आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील वाहन नोंदणी व तपासणी तसेच अनुज्ञाप्ती धारकांची माहिती मिळणेबाबत.

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी ( आक्टोंबर २०१० पासून)

१) सन २०१० या गतवर्षात व २०११ या चालू वर्षात आज तारखेपर्यंत आपल्या कार्यालयात सर्व प्रकारच्या मिळून एकूण किती वाहनांची नोंदणी झाली आहे ? रिक्षा तीन आसनी,सहा आसनी,टूरिस्ट बस,इतर प्रवासी वाहने जड वाहने, इत्यादी प्रत्येक वाहनप्रकाराचा तपशिल द्यावा.

२) सन २०१० या गतवर्षात व २०११ या चालू वर्षात आज तारखेपर्यंत आपल्या कार्यालयात सर्व प्रकारच्या मिळून एकूण किती वाहनांची वार्षीक किंवा नियतकालीन परिक्षण व निरिक्षण झाले किती वाहनांना फिटनेस सर्टिफिकेट देण्यात आले ?किती वाहनांनी आपला व्यावसाय कर भरला ?यातून किती रूपये व्यवसाय करआणि रोड टॅक्स व अन्य कर जमा झाला? रिक्षा तीन आसनी,सहा आसनी,टूरिस्ट बस,इतर प्रवासी वाहने जड वाहने, इत्यादी प्रत्येक वाहनप्रकाराचा तपशिल द्यावा.

३) सन २०१० या गतवर्षात व २०११ या चालू वर्षात आज तारखेपर्यंत आपल्या कार्यालयातून किती स्कूल बस, प्रवासी बस यांची नोंदणी करण्यात आली ?प्रत्येक स्कूलबसच्या मालकांचे नाव व पत्ता तसेच प्रवाशी बसच्या मालकाचे नाव पत्ता द्यावा.प्रत्येक स्कूल व प्रवाशी बसची आसन क्षमता किती आहे ?प्रत्येक स्कूल बस व प्रवाशी बस कडून किती व्यवसाय कर, रोड टॅक्स व अन्य कर भरून घेण्यात आले ? तपशीलवार माहिती द्यावी.

४) आपल्या कार्यालयात एकूण किती खासगी प्रवाशी बस / प्रवाशी वाहतूक वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे ?सन २०१० या गतवर्षात व २०११ यालू वर्षात अशा सर्व प्रवाशी वाहनांकडून किती कर वसूल करण्यात आला ?

६) सन २०१० या गतवर्षात व २०११ यालू वर्षात आज तारखेपर्यंत आपल्या कार्यालय क्षेत्रात अवैध प्रवासी वाहतूक करीत असलेल्या किती वाहनांचे परवाने रद्द केले ? तपशील द्यावा.

७) आपल्या कार्यालय परिसरात वाहन चालविण्यासाठी आवश्यक असणारा चाचणी ट्रॅक आहे काय? मोटर वाहन कायद्यानुसार असा ट्रक असणे आवश्यक आहे काय ?अशा ट्रॅकवरून चाचणी घेतल्याशिवाय कायम वाहन परवाना देता येतो काय?

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश: /पोस्टाने घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे / नाही ( नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :--------------

दिनांक : ------------- (नाव :---------------------------)

Mo:-----------

**माणूस परिस्थितीचा निर्मिती नाही, तर परिस्थिती माणसाची निर्मिती आहे.**

## रोखठोक मत



“सरकार एक ऐसी चमत्कारीक चक्की है, जिसमें १०० किलो अनाज डालने के बाद निचेसे १५ किलो आटा आता है ।”- स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधी कॉंग्रेस शताब्दी अधिवेशनात काढलेले शाश्वत महासत्य राजीव गांधी यांच्यानंतर गेल्या २० वर्षातही कॉंग्रेसपक्ष विसरून गेला आहे.अण्णांची खिल्ली उडवण्यापेक्षा भ्रष्टाचार हे श्वास्वस्त सत्य आठवून कॉंग्रेसजनांनी कठोर लोकपालचा आग्रह धरणे उचित होईल.

# अण्णांचा आवाज,सामान्य माणसांचा हूंकार

# दिल्ली की बिल्ली और शेर अण्णा !

अण्णां हजारे यांनी १६ ऑगष्ट पासून पुन्हा उपोषणाचे हत्यार उपसण्याचा इसार दिला असून शेर अण्णा समोरदिल्ली सरकारचे मांजर झाले असल्याचे दिसत आहे. आता ही दिल्ली की बिल्ली धास्तावली आहे. जंतरमंतर वर अण्णांचे गारूड चालू द्यायचे नाही असे ठरवून १४४ हे कलम लावण्यात आले आहे.उद्या अण्णा हजारे उपोषणास बसले तरी सरकार त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करून अण्णांचा आवाज दाबण्याचा संकेत दिले आहेत.सरकारने हे आता ध्यानात घ्यावे की अण्णाचा आवाज हा लाखो सर्वसामान्य व मध्यमवर्गीय भारतीयांचा आवाज बनला आहे.लाखो युवकांचा त्यांना पाठिंबा आहे.तेव्हा सरकारने भ्रष्टाचाराविषयी अधिक गंभीर व संवेदनशील होणे गरजेचे आहे.सरकार जर अण्णांचा बाबा करण्याचा प्रयत्न करू नये.कारण सच्च्या लोकशक्तीपेक्षा सरकारची दंड व दमणशक्ती कधीच टिकाव धरू शकणार नाही.इंदिरा गांधीनी हा धडा १९७७ मध्ये घेतला होता.या देशातील सामान्य माणूस गरीब जरूर आहे परंतु त्याच्याकडे मोठे राजकीय शहाणपण देखील आहे.या सामान्य माणसाला सत्तेतील मंडळीनी मूर्ख समजू नये.जनता भ्रष्टाचाराने त्रस्त असून जनतेची मानसिकता सरकारने समजावून अण्णा हजारे यांच्या आग्रहाचा आदर संसदेत मांडलेल्या लोकपाल बीला दुरूस्ती कशी करता येईल असे पाहणे उचित होईल.कॉंग्रेसच्या मंडळीनी अण्णा हजारे यांची खिल्ली उडवण्यापेक्षा जनमानस तपासून पहावे.स्वर्गीय राजीव गांधी स्वत: पंतप्रधान असताना त्यांनी जनतेच्या योजनेतील प्रत्येक रूपयामधील १५ पैससुद्धा गरीब जनतेपर्यंत पोहचत नाहीत.असा श्वास्वत सत्य मान्य केले होते.राजीव गांधी यांच्यानंतर दिल्लीच्या राजकीय पुलाखालून खूप पाणी वाहून गेले आहे.सामान्य माणसापर्यंत राजकीय लाभ जर पोहचत नसतील तर सामान्य माणसाला राजसत्तेविरोधात आंदोलन करण्याचा घटनात्मक हक्क आहे.सरकारला तो चिरडता येणार नाही.आणि सरकारने विवेकबुदद्धी न वापरता काही अतातायीपणा केला तर जनआंदोलनाचा भडका उडण्यास वेळ लागणार नाही.आणि याची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना चूकवावी लागेल.सरकारने अण्णांच्या मागण्यांना वाटाण्याच्या अक्षता लावण्याचा प्रयत्न केला तर सामान्य मतदारही आघाडी सरकारची बिघाडी केल्या शिवाय राहणार नाहीत

**- सुभाष बसवेकर**

तुम्ही कुठे जात आहात हे तुम्हाला माहित नसेल तर तुम्ही कोठे पोहचाल कोणास ठाऊक.

## आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विस्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक नागरिक अधिकार या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या शाखेत या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास त्वरीत अंक व वर्गणी मिळाल्याची पावती पाठवली जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्येसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन करीत असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे राज्य व जिल्हा स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई-४१०२१० या पत्यावर पाठवावा.

नेहमी भीतीत राहण्यापेक्षा एकदा धोका पत्करा. - थॉमस फुलर

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१०

| | |
|---|---|
| सभासद क्रमांक | |
| आय.डी. कोड | |

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------

पत्ता :------------------------------------------------

------------------------------------------------

मोबाईल :

शिक्षण : ---------------------- जन्मदिनांक

व्यवसाय :-------------------- येणाऱ्या भाषा: ----------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: -------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : -------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचेपदाधिकारी म्हणून कार्य करण्यास इच्छूक आहात काय ?
असल्यास,कोणत्या स्तरावर : तालूका / जिल्हा / राज्यस्तरीय पदाधिकारी म्हणून .

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा सभासद करून घ्यावे.मी सभासद फी १००रूपये भरीत असून सभासद झाल्याची सभासद पावती व सभासद ओळखपत्र मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी सभासद झाल्यावर भारतीय संविधानाने नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन.

दिनांक : / / २०११ आपला विस्वासू


ठिकाण :

सही

नेहमी भीतीत राहण्यापेक्षा एकदा धोका पत्करा. - थॉमस फुलर

सक्सेस स्टोरीज

# माहिती अधिकाराची जादू वंडरफूल मागीतली माहिती,मिळाले घरकूल!



**एक गरीब माणूस त्याच्या घरकूल मिळण्याच्या हक्कापासून वंचीत ठेवण्याचा सरकारी बाबूचा डाव माहिती अधिकारात माहिती मागवल्यामुळे कसा उधळला गेला. आणि या गरीब सायकल रिक्षा ओढणाऱ्या सामान्य माणसाला सरकारी योजनेतून कसे घरकूल मिळाले.याची प्रेरक कथा सांगणारा हा रिपोर्ट.**

बिहार राज्यातील मधूबनी जिल्हयातील मझलूम नदाफ नावाचा सायकल रिक्षावाला राहतोय.त्याचं वय आहे ७० वर्षे इतकं आहे.आयुष्यभर सायकल रिक्षा आढून आपल्या कुटुंबियाचे भरण-पोषण करत आलाय.

आयुष्यभर कष्ट करून कुटुंबाचं पोट भरण्यापेक्षा दुसरं काहीच त्याला साध्य करता आलेलं नाही.आपलं एक छोटं घर असावं.आपला एक हक्काचा निवारा असावा अस त्याला नेहमी वाटत होतं.

शासनाच्या इंदिरा आवास योजनेच्या माध्यमातून आपल्याला घर बांधून मिळावं म्हणून मझलुम नदाफ यांनी ब्लॉक आफिसरकडे रितसर अर्ज केला.आता आपल्याला सरकारच्या योजनेतून घर मिळेल म्हणून मझलुम खूप आनंदी झाला.

अनेक दिवस वाट पाहिली.त्याच्या समोर इतर काही जणांना घर मिळाली.परंतु इंदिरा आवास योजनेतून मझलुम नदाफ ला घर मिळालंच नाही.प्रत्येक वर्षी सरकारचे कर्मचारी व अधिकारी त्याला गोड बोलून त्यांची बोळवण करायचे.त्याच्या बरोबर अर्ज केलेल्या अनेक लोकांनी सरकारच्या अधिकाऱ्यांना लाच देऊन घरकूल मंजूर करून घेतली होती.मझलूम मात्र गरीबीमुळे पैसे देऊ शकत नव्हता.आपण आयुष्यभर प्रामाणिकपणे कष्ट केले.आयुष्यभर लोकांची यथशक्ती सेवा केली.आपण गरीब असल्यामुळे आपल्याला शासन किमान निवारा देईलच अशी नदाफ मझलूमची अपेक्षा होती.परंतु वयाच्या सत्तरव्या वर्षी दृष्टी धूसर झालेल्या काळात त्यांची एक छोटसं घरकूल मिळण्याची अपेक्षाही धूसर झाली.

आपण घरकूल मिळण्यासाठी पात्र असूनही आपल्याला ब्लॉक आफिसर घरकूल देण्यास टाळाटाळ करतोय.असे लक्षात येताच नदाफला कोणीतरी मधूबनी जिल्हयातील एक स्वंयसेवी संस्थेच्या कायदेविषयक सल्ला संस्थेकडे पाठवले.संस्थेच्या समाजसेवकांकडे नदाफ यांनी आपली कैफियत मांडली.नंतर संस्थेने दिलेल्या सल्ल्यानुसार मझलुम नदाफ यांनी मधूबनी येथील ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर कडे त्याने माहितीच्या अधिकार कायद्यानुसार अर्ज केला.त्या अर्जात घरकूल मिळवण्यासाठी त्याने दिलेल्या प्रस्तावावर गेल्या पाच वर्षापासून काय काय दैनंदिन कारवाई झाली.त्याच्या घरकूल मिळवण्यासाठीच्या अर्जावर काय निर्णय घेतला गेला.अर्जावर आधिकाऱ्यांनी काय काय शेरे टाकले.घरकूल मंजूर करण्याचे अधिकार असणाऱ्या अधिकाऱ्याने माझा अर्ज नामंजूर करताना काय टिपण्णी टाकली.

सदर अर्ज मधूबनी येथील बीडीओ कार्यालयात जाताच तेथील अधिकाऱ्यांनी मझलुम नदाफ ला बोलावून त्याला अतिशय चांगली वागणूक दिली.आफिसच्या कचेरीत त्याला चहाचा मागवून पाजण्यात आला.आफिसरने त्याला लवकरच त्याला घरकूल मंजूर करून देऊ असा शब्द दिला. अवघ्या काही दिवसातच घरकूल बाधण्यांसाठीचा १५,००० रूपयाचा पहिला मदतीचा हप्ताही ब्लॉक ऑफिसरने त्याच्या हातात दिला.

पुढे सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन नदाफ ला घरकूल बांधून मिळाले.

आपल्यावर होत असलेल्या छोटया-मोठया अन्यायाची माहिती मागीतली तर न्याय मिळतो.माहिती अधिकार कायद्यातील ही शक्ती गरीब माणसांसाठी किती मोठा आधार ठरू शकते.हे या सायकल रिक्षा ओढणाऱ्या गरीब माणसांच्या उदाहरणावरून सहज लक्षात येते.

# पैसे मागणाऱ्या भ्रष्ट शासकीय नागोबांना लाचप्रतिबंधक विभागाच्या पिंजऱ्यात बंद करा !



आज जन्माचा दाखला काढायचा असेल तर ग्राम पंचायत,नगरपरिषदेतील क्लार्कला १०० ते २०० रूपये द्यावेच लागतात.तसेच घरातील कोणी मरण पावले तरी त्याच्या वारसांना मृत्यूचा दाखला घ्यायचा असेल तरी लाच म्हणून पैसे द्यावे लागतात.भ्रष्टाचार असा जन्मापासून -मरणापर्यंत आपल्या पाचवीला पूजला आहे.या अधिकारी-कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार सरासर २५ ते ५० हजार रूपये प्रतिमहा इतका पगार मिळत आहे.त्याच वेळी देशात सरासरी रोज २० रूपये पेक्षा कमी उत्पन्न असणारे सुमारे ७० कोटी लोक आहेत.असा केंद्रसरकारच्या सेनगुप्ता समितीचा अहवाल सांगतो.अशा विषम परिस्थितीतही सरकारी बाबू जनतेला नागवे करण्यात धन्यता मानतात ही या देशातील सर्वाधिक बेशर्मीची बाब आहे.

आज सरकारी कार्यालयात पैसे दिल्याशिवाय कोणताच दाखला किंवा परवाना मिळत नाही.या अधिकाऱ्यांना ॲन्टी करप्शन विभागाची /लाच लूचपत प्रतिबंधक विभागाची भीतीच राहिलेली नाही.कारण जेव्हा अधिकारी काम करण्यासाठी पैसे मागतो तेव्हा आपण त्यांना गुपचूप पैसे देतो.खरे तर आपण नागरिकांनी ताठ मानेने पैसे देण्यास नकार दिला पाहिजे तसेच अधिकारी कर्मचारी हे लोकसेवक आहेत व जनता ही या देशाची मालक आहे.हे सूत्र लक्षात घेऊन पैसे मागणाऱ्या कर्मचारी /अधिकाऱ्यांची लाचलूचपत प्रतिबंधक /ॲन्टीकरप्शन विभागाच्या कार्यालयात लेखी तक्रार करायलाच पाहिजे.पैसे मागणाऱ्या प्रत्येक अधिकाऱ्यांना ॲन्टीकरप्शनच्या ट्रपमध्ये अडकवून त्यांना त्यांची जागा दाखवून दिलीच पाहिजे.असे करताना आपले पैसे देवून होत असलले काम नाही झाले तरी चालेल कारण म्हातारी मेल्याचे दु:ख नाही परंतु काळ सोकावता कामा नये.

सर्वात जास्त माया गिळणारे हे काही प्रशासनाच्या अस्तानीतील साप

| अधिकाऱ्याचा हुद्दा | सरासरी वार्षिक काळी कमाई |
|---|---|
| मंत्रालय सचीव | १,००००००० ( एक कोटी रूपये) |
| विभागीय आयुक्त | १,००००००० ( एक कोटी रूपये) |
| जिल्हाधिकारी (कलेक्टर) | ५०,००००० ( पन्नास लाख रूपये) |
| तहसीलदार | २०,००००० ( वीस लाख रूपये) |
| पोलीस सुपरिटेंडंस (एस.पी.) | ५०, ००००० (पन्नास लाख रूपये) |
| आर.टी.ओ. | ५०, ००००० (पन्नास लाख रूपये) |
| मुख्य अभियंता (सा बांधकाम) | २५, ००००० ( पंचवीस लाख रूपये) |
| वरीष्ट पोलीस निरिक्षक | १२,००००० ( बारा लाख रूपये) |
| जिल्हा पुरवठा अधिकारी | १५, ००००० (पंधरा लाख रूपये) |
| जिल्हा परिषद सी.ई ओ. | २५,००००० (पंचवीस लाख रूपये) |
| गट विकास अधिकारी | १२,००००० ( बारा लाख रूपये) |
| अ रेशन पूरवठा अधिकारी | १२,००००० (बारा लाख रूपये) |
| अन्न व औषध अधिकारी | १२,००००० (बारा लाख रूपये) |
| शॉप,फुड /ड्रग इन्सपेक्टर | ६०००००  (सहा लाख रूपये) |
| तलाठी | ५,००००० (पाच लाख रूपये) |
| ग्रामसेवक | ३,००००० (तीन लाख रूपये) |
| पोलीस हवालदार | १,२०,००० (एकलाख वीस हजार) |

## ॲन्टी करप्शन ब्यूरोकडे तक्रार कशी दाखल करावी ?

१) प्रथम ॲन्टी करप्शन ब्यूरोकडे तात्काळ तक्रार दाखल करा.

२) लाचखोर अधिकारी /कर्मचारी कोणत्या कामासाठी किती पैसे लाच मागतो आहे याचा तपशील ॲन्टी करप्शन ब्यूरो कडे द्यावा.

३) ॲन्टी करप्शन ब्यूरोतील अधिकारी आपल्या तक्रारीतील तथ्य जाणून घेतील त्यांना पूरक पूरावे द्या.सहकार्य करा.

४) ॲन्टी करप्शनच्या अधिकाऱ्यांना सापळा रचण्यासाठी विनंती करा

५) योग्य गुप्तता व काळजी सापळा यशस्वी करा.भ्रष्ट अधिकाऱ्यांना लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पिंजऱ्यांत बंद करा.

६) ॲन्टीकरप्शन विभागाचे अधिकारी लाचखोरांना पकडून त्यांच्याव कायद्यानुसार खटला दाखल करतील.

# ॲन्टीकरप्शन ब्यूरो अर्थात लाचलूचपत प्रतिबंधक कार्यालयाचे महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील पत्ते व फोन नंबर येथे दिलेले आहेत.त्याचा जरूर उपयोग करा.आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना घरी पाठवा.

संचालक, ॲन्टीकरप्शन ब्यूरो
६ वा, सर पोचखनवाला रोड,
वरळी पोलीस कॅम्प वरळी, मुंबई
फोन :०२२ २४९२१२१२

ॲन्टी करप्शन ब्यूरो
न्यू अडमिनीस्ट्रेशन बिल्डींग झेड.पी. कम्पाऊंड, सिव्हील लेन, नागपूर
फोन : ०७१२-२२५६१५२०
फॅक्स :२५४०१९०

ॲन्टी करप्शन ब्यूरो
सेवाग्राम रोड, वर्धा
फोन : ७१५२-२४३८४४

ॲन्टी करप्शन ब्यूरो
एम्प्लॉयमेंट ऑफिस जवळ भंडारा
फोन : ७१८४-२५२६६१
फॅक्स :२५४२८७

ॲन्टी करप्शन ब्यूरो
पाण्याच्या टाकीजवळ, सिव्हील लाईन रामनगर, चंद्रपूर
फोन : ७१७२-२५०२५१
फॅक्स :२५५८००

ॲन्टी करप्शन ब्यूरो
गव्हमेंट हॉस्पीटल, इंदिरा गांधी चौक
गडचिरोली, फोन : ७१३२-२३२९२७
फॅक्स :२२२१५९

ॲन्टी करप्शन ब्यूरो
बालाघाट रोड, जगदंबा राईस मिल जवळफोन : ७१८२-२५१२०३

औरंगाबाद
ॲन्टी करप्शन ब्यूरो
जूनी तहसील कार्यालय, बिल्डींग
जूना बाजार, औरंगाबाद
फोन : ०२४०-२३३४०३७
फॅक्स :२३३४०४५

ॲन्टी करप्शन ब्यूरो
पोलीस स्टेशन जवळ, रामनगर,
जालना, फोन : २४८२-२२०२५२
फॅक्स :२२०२५२

ॲन्टी करप्शन ब्यूरो
सेंट्रल बिल्डींग रूम नं.३५
उस्मानाबाद फोन:२४७२-२२२८७९
फॅक्स :२२२८७९

ॲन्टी करप्शन ब्यूरो
पालिका भाजी मार्केट
शरणपूर रोड, नासिक
फोन : ०२५३-२५७८२३०
फॅक्स :२५७५६२८

ॲन्टी करप्शन ब्यूरो
प्रकाश बिल्डींग, मील रोड
फोन :२५६२-२३४०२०

ॲन्टी करप्शन ब्यूरो
प्लॉट नं.१०३, पहिला मजला,
कल्पना पॅलेस, गणेशवाडी
स्टेशनरोड, अहमदनगर
फोन : २४१-२४२३६७७

ॲन्टी करप्शन ब्यूरो
रामनिवास, दिनानाथवाडी
रिंगरोड, जळगांव
फोन : २५७-२३५४७७

ॲन्टी करप्शन ब्यूरो
प्लॉट नं.१२, जयचंदनगर
कोरीट नाक्याजवळ नंदूरबार
फोन :९८२३४०२७९८

ॲन्टी करप्शन ब्यूरो
सेंट्रल बिल्डींग कम्पाऊंड
सी-बरॅक, पुणे-४११ ००१
फोन : ०२०-२६१३२८०२
फॅक्स : २६१२१४०३

ॲन्टी करप्शन ब्यूरो
ग्रामीण पोलीस स्टेशनजवळ
सांगली
फोन : ०२३३-२३७३०९५

ॲन्टी करप्शन ब्यूरो
२१२०, सी-वार्ड,
शनिवार पेठ कोल्हापूर
फोन : ०२३१-२५४०९८९

ॲन्टी करप्शन ब्यूरो
गव्हमेंट कॉलनी,
रंगभवन जवळ
सोलापूर फोन :

ॲन्टी करप्शन ब्यूरो
सेंट्रल जेल समोर, कोर्ट नाका
ठाणे (प.)४००६०१
फोन : ०२२-२५४३१३८८
फॅक्स : २५४२७९७९

ॲन्टी करप्शन ब्यूरो
एपीएमसी फ्रुट मार्केट
सेंट्रल फॅसीलिटी बिल्डींग
रुम नं.५०५, सेक्टर-१९
तूर्भे नवी मुंबई
फोन : ०२२-२७८३३३४४
फॅक्स : २७८३३३४४

ॲन्टी करप्शन ब्यूरो
अंगण प्लाझा समोर
मारूती मंदिराजवळ
रत्नागिरी
फोन : ०२३५२-२२२८९३
फॅक्स : २७१२५८

ॲन्टी करप्शन ब्यूरो
ओल्ड कलेक्टर
ऑफिस कम्पाऊंड, कुडाळ
सिंधूदुर्ग
फोन : ०२३६२-२२२२८९
फॅक्स : २२२२८९

ॲन्टी करप्शन ब्यूरो
पाटील सदन, ब्लॉक नं.-१
चेंढरे, नागडोंगरी, अलिबाग
जिल्हा रायगड
फोन : ०२१४१-२२२३३१
फॅक्स :२२२३३१

ॲन्टी करप्शन ब्यूरो
सिव्हील हॉस्पीटल जवळ
बीड रोड, बीड
फोन : २४४२-२२२६४९
फॅक्स :२२२६४९

ॲन्टी करप्शन ब्यूरो
जिल्हा अधिकारी कार्यालय
कम्पाऊंड अमरावती
फोन : ०७२१-२५५२३५५
फॅक्स :२५२३०५५

ॲन्टी करप्शन ब्यूरो
टागा चौक, दगडी स्कूल बिल्डिंग
तहसील ऑफिस जवळ, यवतमाळ
फोन :७२३२-२४४००२

ॲन्टी करप्शन ब्यूरो
जिल्हा मध्यवर्ती बँक,
सिव्हील लाईल अकोला
फोन :०७२४-२४२०३७०

ॲन्टी करप्शन ब्यूरो
चैतन्यवाडी, पाडूरंग समर्थ बिल्डींग
बुलढाणा फोन :७२३२-२३५९३३

ॲन्टी करप्शन ब्यूरो
मिलिंद गॅस गोडावून
लाखाळा, वाशिम
फोन :०७२५२-२३५९३३

ॲन्टी करप्शन ब्यूरो
नागार्जून सागर, स्नेहनगर पोलीस कॉलनी
स्नेहनगर, मेन रोड नांदेड
फोन : २४६२-२५५८११ फॅक्स :२५५८११

ॲन्टी करप्शन ब्यूरो
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर
लातूर फोन : २३८२-२४६२७४

ॲन्टी करप्शन ब्यूरो
सत्कार लॉजच्या पाठीमागे
स्टेशन रोड, परभणी
फोन : २४५२-२२०५९७

ॲन्टी करप्शन ब्यूरो
अझाम कॉलनी, कोथलूज रोड
हिंगोली
फोन : ७१३२-२३२९२७ फॅक्स :२२२१५९

**काही लोक पैशाचे मालक असतात तर काही लोकांचा मालक पैसा हाच असतो**

# राज्य मानवी आयोगाकडे तक्रार कशी दाखल करावी ?

आपण सारी माणसं आहोत.जगातल्या प्रत्येक माणसाला सगळेच मानवीय अधिकार त्याच्या जन्माबरोबरच प्राप्त होतात.या मानवीय अधिकारात वंश,रंग,लिंग,भाषा,प्रांत,जात,धर्म,राजकीय मत-मतांतरे यामुळे काहीही फरक पडत नाही.

संयुक्त राष्ट्र संघाच्या मानव अधिकार मसुद्याप्रमाणे मानव अधिकारांची दोन प्रकारात विभागणी केली जाते.आपल्या राज्यघटनेतही यातील बहूतांश सर्वच अधिकार समाविष्ट झालेले आहेत.

अ) नागरी व राजकीय अधिकार (Civil and political rights)

प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जीवन जगण्यासाठी अतिआवश्यक असणारे अधिकार या प्रकारात मोडतात.

१) स्वातंत्र्यात व सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार
२) व्यक्तीगत खासगीपणा जपण्याचा अधिकार
३) व्यावसाय स्वातंत्र्य व मालमत्ता खरेदीचा अधिकार
४) विचार स्वातंत्र्य,भाषण स्वातंत्र्य,अभिव्यक्ती स्वातंत्र्य.
५) अमानवीय जाच व अमानवीय वागणूकीपासून सरंक्षण
६) मत देण्याचा अधिकार,सार्वजनिक विचार स्वातंत्र
७) संघटीत होण्याचा,संघटना निर्माण करण्याचा अधिकार

ब) आर्थिक,सामाजिक व सांस्कृतिक अधिकार
(Economic,social & cultural Rights)

१)जीवन जगण्यासाठी असणाऱ्या किमान गरजा प्रत्येक मनुष्यमात्राला अधिकारवाणीने मिळाल्या पाहिजेत.जसे
१)अन्न,वस्त्र निवारा याची किमान उपलब्धतेचा अधिकार
२) शाररिक व मानसिक आरोग्य मिळण्याचा अधिकार
३) शिक्षणाची व सामाजिक सुरक्षा मिळण्याचा अधिकार

आपल्या देशात मानव अधिकार संरक्षण कायदा २८ सप्टेंबर १९९३ या दिवशी देशभर लागू झाला.या कायद्यान्वये राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना करण्यात आली.देशातील प्रत्येक व्यक्तीला आपले मानवीय अधिकार कायम क्रियाशील ठेवण्यासाठी अधिकाधिक उत्तम सार्वजनिक वातावरण व परिप्रेक्ष्य मिळावा यासाठी आपली शासकीय व प्रशासकीय संरचना कार्यरत असते.या संरचनेकडून जर कोणत्याही व्यक्तीच्या मानवी अधिकारांचे हनन होत असल्यास किंवा झाले असल्यास प्रत्येक व्यक्तीला राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाकडे न्याय मागण्यासाठी तक्रार करता येते.मानव अधिकारांचे हनन झालेल्या काही गंभीर प्रसंगात आयोग स्वयंप्रेरीत होऊन तक्रारीची दखल घेऊन न्याय प्रक्रिया सुरू करू शकतो.राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाप्रमाणेच भारतातील प्रत्येक राज्यात राज्य मानव अधिकार आयोगांची स्थापना करण्यात आली आहे.मानव आयोगाकडे कोण व कोणत्या तक्रारी दाखल करू शकतो.१) कोणत्याही शासकीय अधिकाऱ्यांकडून ,कर्मचाऱ्यांकडून कोणत्याही व्यक्तीच्या मानवी अधिकारांचे हनन झाल्यास अशी पिडीत व्यक्ती अशा शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांच्या विरोधात मानव अधिकार आयोगाकडे तक्रार करून न्याय मागू शकता

### अशा घटनाविरूद्ध तक्रार करता येईल

.उदा :१) पोलीसांकडून सामान्य व्यक्तीची जर छळवणूक होत असेल तर मानव अधिकार आयोगाकडे तक्रार दाखल करता येते. २) पोलीस कोठडीत जर आरोपीला अमानवीय पद्धतीने मारहाण व छळ होत असल्यास, ३) पोलीस कोठडीत आरोपीचा मृत्यू झाल्यास

४) तुरूंगात तसेच बाल व महिला सुधारगृहात दाखल व्यक्ती,मुले किंवा महिला यांना अमानवीय वागणूक मिळत असेल किंवा त्यांचा छळ होत असल्यास,

५) पोलीसांशिवाय कोणत्याही शासकीय अधिकाऱ्यांने कोणत्याही भारतीय व्यक्तीच्या मानव अधिकारांचे हनन करण्याची कसूर होत असल्यास जात,धर्म, लिंग,भाषा यावरून व्यक्तीच्या व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होत असल्यास मानव आधिकार आयोगाकडे तक्रार दाखल करता येते. उदा : मालमत्ता किंवा संपती खरेदी करण्यात सरकारी अधिकारी प्रतिबंध करीत असल्यास.लेखन,भाषण,संचार करण्यास प्रशासकीय व्यवस्था अडथळा आणत असल्यास. ६) पोलीसांनी किंवा अन्य सरकारी अधिकाऱ्यांनी खोटी तक्रार किंवा खोटा आरोप लावून तसेच आपली फसवणूक करून जर आपला मानसिक आर्थिक व शाररिक छळ चालवला असेल तर मानव अधिकार आयोगाकडे दाद मागता येते.

भारतीय राज्य घटनेने प्रत्येक नागरिकांस त्याचे मूलभूत हक्क व अधिकार दिले आहेत.प्रशासकीय यंत्रणेकडून एखाद्या व्यक्तीच्या या हक्कांची पायमल्ली झाल्यास त्यावेळी त्या नागरिकांच्या मदतीला मानवी हक्क आयोग धावून येतो.जाणून घेऊया आयोगाच्या कार्यपद्धतीविषयी
मानवी हक्क सरक्षंण अधिनियम १९९३ हा २८ सप्टेंबर १९९३ रोजी लागू झाला.राज्य मानवी हक्क आयोग नोव्हेंबर २००१ रोजी स्थापन झाला.

### तक्रार करण्याची पद्धत

१) तक्रार सरकारी अधिकाऱ्याविरूद्ध करता येते.
२) अशी कोणतीही व्यक्ती की ज्याच्या मानवी हक्काचे उल्लंघन किंवा हनन झाले असेल त्या व्यक्तीस किंवा त्या व्यक्तीच्या वतीने कोणत्याही व्यक्ती स्व:त अथवा पोस्टाने मानवी हक्क आयोगाकडे तक्रार करू शकतात.
३) कोणत्याही स्वरूपाचे शुल्क अथवा तिकीट लागत नाही.
४) सदर तक्रार ही अध्यक्ष किंवा सचिव ,राज्य मानवी हक्क आयोग यांना संबोधून स्वच्छ साध्या कागदावर सविस्तपणे आपल्या शब्दात लिहून करावी.अन्याय अत्याचाराचे स्वरूप,ठिकाण,जबाबदार अधिकारी ,आदी उल्लेख करावा.

५) तक्रार ही मराठी हिंदी इंग्रजी तसेच गुजराती भाषेतून करता येईल.

तक्रार दाखल करण्यासाठी संपर्क

**राष्ट्रीय मानव अधिकार आयोग**
**सरदार पटेल भवन,**
**शंसद मार्ग,नवी दिल्ली ११० ००१**
**फोनः(०११)३३४ ६२४४, ३०१ ०९४१**
वेबसाईट :www.nhrc.nic.in

**राज्य मानव अधिकार आयोग**
**फोर्ट, मुंबई**
**फोनः (०२२)**

# आमदार निधीत घोटाळा ?

## आपल्या भागातील आमदारांची निधीचा हिशोब मागा.

महाराष्ट्राच्या विधीमंडळात विधानसभा आणि विधानपरिषद ही दोन सभागृहे आहेत. विधानसभेत २८९ आणि विधानपरिषदेत ७८ आमदार आहेत.ही एकूण संख्या होते ३६७ इतकी. या सर्व आमदारांना प्रत्येक वर्षाला प्रतिआमदार एक कोटी (अलिकडेच वाढीव घोषणा झाली आहे प्रतिवर्ष दीड कोटी इतका निधी देण्याची )इतका विकास निधी मिळतो. या निधीमधून आमदार त्यांना योग्य वाटेल अशा विकास कामासाठी निधी देऊ शकतात. हा सर्वस्वी आमदारांच्या इच्छे नुसार वितरीत होते. मात्र या वितरणावर जिल्हाधिकारी यांचे नियंत्रण असते.तसेच या निधीच्या दैनंदिन व्यय व्यवस्थापनाचे काम जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेतील जिल्हा नियोजन समितीकडे असते. परंतु हा विकास निधी कोणत्या सार्वजनिक कामासाठी द्यावा. कधी द्यावा, किती द्यावा हे सर्वस्वी आमदार महोदयांच्या इच्छेनुसार ठरते.



राष्ट्राच्या विधीमंडळातील हाताच्या बोटावर ़च लोकप्रतिनिधी सोडले तर या निधीचा वापर ामदारांनी व्यापक सार्वजनिक हिताला हरताळ ातलगांचे हित, आपल्या कार्यकर्त्यांचे हित, आपल्या पक्षाचे हित आणि आपणच पोसलेल्या कंत्राटदाराचे हित पाहतात.असा आजवरचा अनुभव आहे.

आमदार हे खरे तर जनतेचे प्रतिनिधी आहेत.त्यांनी घेतलेल्या विकास निधीच्या खर्चात खरे तर जनतेच्या विकासाचे प्रतिबिंब दिसायला हवे.परंतु बरेच आमदार या निधीचा मनमानी असा वापर करताना दिसत आहेत.मुंबईतील काही माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी या आमदारांच्या विकास निधी ची माहिती अधिकार कायद्यान्वये मागवली असता.त्यात आश्चर्यकारक अशी अनियमिता आढळली.अंगणवाडीच्या नावाने बांधलेल्या इमारतीत सदरील आमदारांच्या पक्षाचे कार्यलय काही कार्यकर्ते चालवत असलेले आढळूनआले.तसेच आमदार निधीच्या खर्चातही मोठी संधिग्धता असलेले दिसून आले.आमदार निधी जरी आमदारांनी स्वच्छेने वापरायचा निधी असला तरी तो खऱ्या अर्थाने जनतेचा पैसा आहे.जनतेला दरवर्षी खर्च होणाऱ्या पाचशे कोटी रुपयांचे होते तरी काय याचा हिशेब मागण्याचा पूर्ण अधिकार आहे.म्हणून माहिती अधिकार या कायद्याचा वापर करुन आरटीआय कार्यकर्त्यांनी या निधीचा हिशेब तपासून या निधीच्या विनीयोगात आधिक पारदर्शकता कशी आणता येईल ? हे पाहिले पाहिजे.

**नागरिक अधिकार** हे मासिक आपल्या सेवेत प्रसिद्ध होत आहे.सामाजिक कार्यकर्त,आरटीआय कार्यकर्त्यांनी आपले माहिती अधिकार वापरताना आलेले अनुभव,आपल्या सक्सेस स्टोरीज् तसेच त्यांनी वापरलेले प्रभावी अर्जाचे नमूने, माहिती अधिकार कार्यकर्त्यांच्या कार्याचा परिचय, अशा प्रकारातील लेख व अनुभव लिहून पाठवावेत योग्य ती प्रसिद्धी दिली जाईल. मासिक नागरिक अधिकार हे माहिती अधिकारांचा वापर करून प्रशासन पारदर्शक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आपले हक्कांचे व्यासपीठ असणार आहे.आपल्या हक्काचे हे व्यासपीठ बळकट करण्यासाठी आपण नक्की सहकार्य कराल हा विस्वास आहे.

माणूस थकल्यानंतरही बरेचसे अतर चालू शकतो

# वजने मापे कार्यालयातील घडामोडीची माहिती घेण्यासाठी नमूना अर्ज

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती अधिकारी

वजने मापे जिल्हा कार्यालय

जिल्हा

१) अर्जदाराचे नांव ------------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता ::------------------------------------------------

३) माहितीचा विषय :वैद्यमापन / वजने मापे विभागने केलेली कारवाई

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (पुढीलप्रमाणे)

१) २०१० आणि २०११ या चालू वर्षात आज तारखेपर्यंत आपल्या आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात किती वजन मापे दुरूस्ती करणारे अधिकृत परवाने धारक आहेत? या परवानाधारकांचे नाव पत्ता व शैक्षणिक अर्हता याचा तपशील द्यावा

२) सन २०१० या गतवर्षात व २०११ या चालू वर्षात हा अर्ज करण्याच्या तारखेपर्यंत आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात विक्री वस्तू किंवा पदार्थांच्या बंद वेष्ठनावर कायदेशीर रित्या अपेक्षित माहिती किंवा मजकूर नसल्यामुळे किती यावसायिकांवर कारवाई करण्यात आली ?

३) सन २०१० या गतवर्षात व २०११ या चालू वर्षात आज तारखेपर्यंत आपल्या कार्यालय क्षेत्रात किती व्यावसायिकांनी वजने आणि मापे तपासून आणि प्रमाणित करून घेतले ? त्यापासून आपल्या कार्यालयास किती महसूल प्राप्त झाला ?

४) ३) सन २०१० पासून २०११ या चालू वर्षात आज तारखेपर्यंत आपल्या कार्यालय क्षेत्रात किती व्यावसायिकांवर एम आर पी पेक्षा अधिक किंमतीने वस्तू विकल्याबद्दल कारवाई करण्यात आली? याकारवाईतून कार्यालयाला किती रूपये दंड वसूल झाला ?

५) आपल्या कार्यालयात एकूण किती अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत ? त्यांचे पगार व इतर सर्व भत्ते मिळून प्रत्येकी मासिक वेतन किती ? तसेच याच कार्यालयात बदली न होता तीन वर्षापेक्षा आधिक कालावधीत सलग कार्यरत असणा-या कर्मचारी-अधिकारी यांची संख्या व नावे आणि हुद्दा याचा तपशील द्यावा ?

६) आपल्या कार्यक्षेत्रात वेष्ठण किंवा पँकिंग पद्धतीने अन्न पदार्थ, मसाले, विद्यूत उपकरणे,तंबाखू, किंवा बाटलीबंद पाणी, आणि तत्सम साहित्या विक्री करणारे किती व्यावसायिक आहेत.आपल्या कार्यालयात याची नोंद आहे काय ? असल्यास त्यांची संख्या किती ?

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश:/पोस्टाने

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही/आहे (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण : (नाव---------------)

दिनांक : **Mo:-----------**

मिनिटाची काळजी घ्या, तास स्वत:ची काळजी घेईल.

# सोनोग्राफी सेंटर्सची विषयी माहितीच्या अधिकारात मागवायची माहिती.

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी

आरोग्य विभाग

महा / नगरपालिका --------

१)अर्जदाराचे पूर्ण नाव :----------------------------------

२)पत्रव्यवहाराचा पत्ता :----------------------------------

३)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :(विषय व कालावधी)

१) अ) --------- नगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण किती हॉस्पीटल / नर्सिंग होम मध्ये सोनोग्राफी मशीन साठी परवानगी देण्यात आली आहे ? हॉस्पीटल / नर्सिंग होम / डॉक्टरांच्या नाव व पत्ता अशी यादी व प्रत्येक ठिकाणी कार्यरत सोनोग्राफी मशीनची संख्या अशी संख्या द्यावी. ब) असा परवाना देण्यासाठी नगरपालिका किती फीस आकारते ? क )तसेच परवान्यासाठी कोणकोणती कागदपत्रे आवश्यक आहेत त्याची यादी द्यावी.

२)अ )सोनोग्राफी मशीन असलेल्या प्रत्येक हॉस्पीटल / नर्सिंग होम / दवाखान्यात गर्भलिंग चिकित्साप्रतिबंधक कायद्याचे पूर्ण पालन केले जाते काय ? ब )यावर देखरेख करणाऱ्या आरोग्य अधिकाऱ्यांचे नाव व हुद्दा द्यावा. गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक कायद्याचे पालन न केल्याबद्दल किंवा कायदा भंग केल्याबद्दल २००९ पासून किती सोनोग्राफी मशीन असलेल्या ठिकाणी आपल्या विभागाने ƒायदेशीर कारवाई केली ? किती सोनोग्राफी मशीन परवानाधारकांना किती रूपये दंड किंवा शास्ती किंवा शिक्षा झाली याचा नाव पत्ता कारवाईचा दिंनाक दंड किंवा शास्ती झाल्याचा दिंनाक आदीसह माहिती द्यावी.

३)प्रत्येक सोनो ग्राफी केंद्रावर गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक कायद्याची पुस्तिका गर्भलिंग निदान करण्यास बंदी असल्याचे फलक दर्शनी भागात लावलेले असल्याबद्दल निरिक्षण वहीतील आरोग्य निरिक्षकाची नोंद द्यावी.

४)सोनो ग्राफी केंद्रावर गर्भलिंग चिंकित्सा केली जाऊ नये म्हणून आरोग्य विभगाच्या वतीने केलेले प्रतिबंधक उपाय / स्टींग ऑपरेशन आदीची निर्णयांची माहिती द्यावी.

५) २००९ पासून २०११ पर्यंतच्या दरवर्षी -------- नगरपालिका कार्यक्षेत्रात जन्माला आलेल्या मुलांची व मुलींची नोंदणी झालेली संख्या प्रत्येक वर्षाची व मुलांची व मुलीची अशी वेगवेगळी द्यावी.

६) अ ) गर्भलिंग चाचणी प्रतिबंधासाठी कार्यरत असणाऱ्यानगरपालिका स्तरावरील लोकप्रतिनिधी व नागरिक यांचा सहभाग असणारी समिती कार्यरत आहे काय ? ब )असल्यास समितीच्या अध्यक्ष सदस्य याची नावे व पत्ते द्यावेत. क) या समितीच्या २०१० पासून २०११ अखेर पर्यंत प्रत्येक वर्षी किती वेळा बैठका झाल्या ? शेवटच्या बैठकीचे मिनीटस् प्रत द्यावी.

४) माहिती टपालाने हवी की व्यक्तिशः व्यक्तीशः/टपालाने

५) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे /नाही (नसल्यास १० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण :----------- अर्जदाराची सही

दिनांक : - - २०११ (नाव----------------------------)

सत्याने जेव्हा बूटही चढवलेले नसतात तोपर्यंत असत्य पहायला सुररू करते. मात्र जिंकते शेवटी सत्य

# बालकामगारांची माहिती मागवण्यासाठी नमूना अर्ज

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

(झोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती अधिकारी

कामगार आयुक्त कार्यालय,

---------------- जि.------------------

१) अर्जदाराचे नांव - ---------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :-------------------------------------------

३) माहितीचा विषय - बाल कामगार(प्रतिबंध व नियमन)अधिनियम १९८६ या कायद्याच्या अंमलबजावणी विषयी माहिती मिळणे बाबत

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (पुढीलप्रमाणे)

१) आपल्या कार्यालयाच्या सन.२००९ पासून चालू २०११ या वर्षात आज अखेर पर्यंत १४ वर्षाखालील किती बालकामगार मुले बालकामगार(प्रतिबंध व नियमन)अधिनियम,१९८६ मध्ये विविक्षित व्यवसाय सूची भाग " अ " भाग " ब " भाग " क " भाग " ख " तसेच धोकादायक व्यवसायात आढळून आले.अशा व्यवसायात बालकामगार म्हणून काम करणारे किती बालकामगारांची छापा, किंवा रेड टाकून सोडवणूक करण्यात आली अशा किती आस्थापना मालकांवर गुन्हे नोंदविण्यात आले ? त्यांच्याकडून किती रूपये आर्थिक दंड वसूल करण्यात आला ?वसूल केलेल्या दंडाचा विनीयोग बालकामगारांच्या शिक्षण व सक्षमीकरणाच्या कामी खर्च केला काय ? नसल्यास दंड कोठे जमा आहे ?

२) आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सन. २०१० या वर्षात आणि चालू २०११ या वर्षात फेब्रुवारी अखेरपर्यंत बालकामगार कामावर ठेवलेल्या किती आस्थापना मालकांनी बालकामगार(प्रतिबंध व नियमन)अधिनियम,१९८६ कलम ११ अन्वये आवश्यक असलेल्या नोंदवहया ठेवल्या आहेत ? नोंदविलेल्या नोंदवहयाच्या सत्यप्रती उपलब्ध करून द्याव्यात.

३) आपल्या कार्यालयाच्या सन. २०१० या वर्षात आणि चालू २०११ या वर्षात फेब्रुवारी अखेरपर्यंत बालकामगार कामावर ठेवलेल्या किती आस्थापना मालकांनी बालकामगार(प्रतिबंध व नियमन)अधिनियम,१९८६ कलम ९ (१) अन्वये बालकामगार कामावर ठेवल्याबद्दल आपल्या कार्यालयातील आस्थापना कार्यरत असलेल्या स्थानिक सीमामध्ये नियुक्त केलेल्या निरिक्षकांस लेखी नोटीसा पाठविल्या आहेत काय ? अशा नोटीसांच्या सत्यप्रती उपलब्ध करून द्याव्यात.

४) आपल्या कार्यालयाच्या सन.२०१० या वर्षात आणि चालू २०११ या वर्षात आज अखेरपर्यत बालकामगार म्हणून काम करणाऱ्या किती बालकांच्या वयासंबधी निरिक्षक व आस्थापना मालक यांच्यात वाद उपस्थित झाले ?अशा परिस्थितीत किती बालकांमगारांची निरिक्षकांने सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याकडून वयाची तपासणी करून प्रमाणपत्रे घेतली ?बालकामगार निरिक्षकाकडे असलेल्या या सबंधातील नोंदीची कागदपत्रे द्यावीत.

५)------- जिल्हया मध्ये बालकामगार(प्रतिबंध व नियमन)अधिनियम,१९८६ अन्यये सूचविण्यात आलेली बालकामगार शोध व पूनर्वसन समिती तसेच स्कॉड सद्या कार्यरत आहे काय ? या समितीच्या २००९ व २०१० मध्ये किती बैठका झाल्या?सदर समितीच्या पदाधिकारी व सदस्य यांचे नाव व पत्ते द्यावेत.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीशः/टपालाने

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही /आहे असल्यास (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण (नाव--------------------)

दि.---------------------- मो.-----------------------

पैशाने आनंद मिळण्याची खात्री नाही. तुमच्या पसंतीचे दु:ख मात्र निश्चित मिळते

शेवटचे पान ..

# प्रेरणा

## जीवनाला ऊर्जा देणार इंधन !

आपण आपल्या कामाच्या ठिकाणी, कार्यालयात किंवा कोठेही इतरांना काही सेवा,वस्तू किंवा अन्य काही देणे देताना जे देवू ते आपल्या क्षमते प्रमाणे सर्वोत्तम देवू तसेच त्या देण्यामध्ये आपल्या मनाचा व भावनेचा ओलावा ओतून देवू हा संकल्प आपण केलाच पाहिजे.

## गोरा कुंभाराच्या सर्वोत्तम मडक्याचे रहस्य !

संत गोरा कुंभार हे तेर या गावातील बाजारात मडकी विकायचे.इतर कुंभाराच्यापेक्षा बाजारात त्यांची मडकी भरपूर विकली जायची.कारण गोरा कुंभाराची मडकी म्हटली की ती टिकावू, मजबूत व उत्तम अशीच असणार असा ग्राहकांत त्यांचा नाव लौकीक झाला होता.त्यामुळे इतर कुंभार मंडळी संत गोरा कुंभाराचा द्वेष करायचे.परंतु विठ्ठल भक्तीत रममाण झालेले गोरा कुंभार आपण भले आणि आपले काम भले असा विचार करीत राहायचे.

सर्व कुंभारांनी एकदा गोरा कुंभाराच्या भेट घेतली आणि त्यांची मडकी कशामुळे पक्की, टिकावू व मजबूत होतात.याचे रहस्य विचारले तेव्हा आपल्या व्यवसाय बंधूंना गोरा कुंभारांनी अत्यंत नम्रपणे सांगितले की, “बंधूनो मी ही तुमच्या प्रमाणेच मातीचीच मडकी बनवतो.परंतु मी प्रत्येक मडके मला जितके उत्तम बनवता येईल तितके उत्तम बनवतो.प्रत्येक मडके विकून त्यातून भरपूर पैसा येईल या भावनेने मी ते बनवतच नाही. तर माझे प्रत्येक मडके हे मी पाडूरंगाच्या चरणी अर्पण करायचे आहे या भावनने बनवतो.माझ्या प्रिय पाडूरंगाला जे अर्पण करायचे ते सर्वोत्तम असेच असले पाहिजे हा भाव प्रत्येक मडके बनवताना माझ्या मनात असतो ”

प्रति,

BOOK-POST

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर -१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५१६१२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
MAHMAR39311/13/1/2011TC